# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 2


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar



Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 2**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Chief Editor**
**Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)**

**Dr. S. S. Undare (Vice Principal)**
**Dr. G. A. Mohite (Vice Principal)**

**Editor**
**Dr. R. K. Kale**

**Co-Editors**
**Dr. S. N. Akulwar**
**Dr. B. D. Jadhavar**
**Dr. S. E. Ghumatkar**

**Balbhim Arts, Science & Commerce College, Beed**

**Shaurya Publication, Latur**

38. लोकप्रशासनामधील नवीन सुधारणा 154
डॉ.इरलापल्ले पी.बी.
39. भारतीय क्रांतीकारी चळवळीत महिलांचे योगदान 156
प्रा.डॉ. जाधवर बी.डी.
40. जात आणि Nation 159
जावळे बाबासाहेब नागोराव
41. भारतीय इतिहासातील स्त्रीवाद 161
प्रा. जिजा हनुमंत रेडके
42. "ग्रामीण विकास प्रशासनातील माहिती तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण आणि यशदाची भूमिका : विशेष संदर्भ महाराष्ट्र" 164
फुलारी ज्योती महिशंकर
43. "सबाल्टर्न लेखन प्रवाह नवा आशयघन आकृतीबंध" 170
प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम
44. भारताच्या परकीय व्यापाराची बदली रचना आणि दिशा 173
**कदम व्ही. बी.** , प्रा.डॉ. एस.एस. पतंगे
45. सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान 177
कल्पना गोविंदराज बडे
46. जगासमोरील गंभीर समस्या : दहशतवाद 181
प्रा. डॉ. कल्याण आश्रु वरळे
47. राज्य प्रशासनात राज्यपालांची भूमिका 184
ऐश्वर्या अशोक कांबळे
48. "भारताचे राजकारण आणि जातीवाद" 189
प्रा. कमलाकर शरद इंगळे
49. महिला सशक्तिकरणात शिक्षणाचे महत्त्व 190
प्रा. डॉ. कमलेश नारायणलाल गुप्ता
50. स्थानिक इतिहास लेखनाची आवश्यकता 193
सहा. प्रा. कांतराव किसनराव कलाणे
51. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : चिंतन 195
प्रा.डॉ.विद्यासागर पुं. सोनकांबळे
52. राजकीय पक्ष संकल्पना आणि स्वरूप 197
आबासाहेब आर.कसबे
53. नक्षलवाद -काल आज आणि उदया 200
भास्कर कसोटे, प्रा.डॉ.आर.के.काळे
54. भारतीय राजकीय प्रक्रियेत जातीची भूमिका : एक निरीक्षण 203
प्रा.डॉ. बळीराम कटारे
55. ‘‘भारतातील कामगार चळवळ’’ 206
प्रा. केशव देविदासराव पावडे
56. "भारतीय राजकारणातील सांस्कृतिक राष्ट्रवाद" 212
खंदारे एन.व्ही

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# नक्षलवाद -काल आज आणि उदया

**भास्कर कसोटे**
संशोधक विदयार्थी
बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य
महाविदयालय, बीड.

**प्रा.डॉ.आर.के.काळे**
विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग बलभीम, कला, विज्ञान व वाणिज्य
महाविदयालय, बीड

---

**प्रस्तावना** :

भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेला सर्वात मोठे आव्हान नक्षलवादाचे आहे असे जाहीर विधान पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी 2006 मध्येकेलेहोते.गेल्या काहीकाळातील नक्षलवादयांच्या संदर्भातील घटना यांचा अभ्यास केला असता शहरी मध्यमवर्गाचे, उच्चशिक्षितांचेतसेच शिक्षीत तरुण वर्गाचे लक्ष या प्रश्नाकडे अधिक वेधले गेल्याचे दिसते.नक्षलवादी चळवळीचा अभ्यास करतांना आपल्याला सखोल आणि भरीव असेसाहित्य वाचण्यास मिळते.सन 2009 च्या साधना साप्ताहिकामध्ये नक्षलवादाचे आव्हान या विशेष लेखातुन नक्षलवादाच्या प्रश्नाची व्याप्तीसमजुन येते. देवेंद्र गावंडे यांच्या 2010 मध्ये सुरुझालेल्या आणि पुढे सव्वा वर्ष चाललेल्या दंडकारण्यातुन हि लेखमाला महाराष्ट्र, आंधप्रदेश, ओडिशा, छत्तीसगड या राज्यावर विशेष भाष्य करते

नक्षलवादांचा प्रश्न विविध प्रकारांनी सतत चर्चेत असलेला दिसतोकधी निवडणुकांवर घातलेल्या बहिष्कारामुळे,कधी पोलिस जवानांची हत्याकेल्यामुळे, कधी सुरुंगाचे स्फोट, तरकधी शहरी भागातल्या तरुणांचा नक्षलवादी असल्याच्या आरोपावरुन अटकझाल्यामुळे देशभरात एकुण दिडशे जिल्हयामध्ये नक्षलवादी कारवाया चालतात असे भारत सरकारचेगृहखातेसांगते. नक्षलवादी गटाच्या कारवाईचा हा प्रभाव, त्यांचीहिंसापूर्ण चळवळ, सशस्त्र लढयाचीतयारी, अतिमागास आदिवासी प्रदेशात त्यांना मिळणारे पाठबळ, राज्य आणि केंद्रसरकारलाकेलेला असहकार यासर्व कारणांमुळे नक्षलवादाच्या प्रश्नाबाददल, उदिष्टांबददल, कार्यपध्दतीबददल आणि परिणामांबददल आपल्याला जागरुक नागरिक म्हणून माहिती आणि दृष्टी मिळण्यासाठी या शोध निबंधाचा रचनाकरण्यात आली आहे

**नक्षलवादी चळवळ काल आणि आज**

दहशतवादानंतर देशाच्या सार्वभौम एकतेला आणि अखंडतेला बाधा पोहचवणारी सर्वात मोठीगोष्टकोणती असेलतरती म्हणजेच नक्षलवाद आहे. देशालागृह युध्दातढकण्यात या चळवळीचा हात आहे. 1967 साली चारु मुजुमदार, कनु संन्याल जंगल संभाल या तिघाच्या नेतृत्वात पश्चिम बंगालच्या नक्षलवादी या लहानशा गावात भुमिहीनांनी उठाव केला आणि एक सशस्त्र राजकीय आंदोलनाला प्रारंभ झाला. या उठावाचे कारण केवळ आदिवासी, भुमिहीन नाहीत या उठावाला स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तरकाळात झालेल्या विविध आंदोलनाकडे नजर टाकावी लागते.1967 मध्येझालेल्या या उठावामागे किमानतीन दशकांचाकम्युनिष्ट चळवळीचा इतिहास आहे.या इतिहासाच्या टप्प्यावर नजर टाकलीकी, या उठावामागील कारणे आपोआप लक्षात येतात. 1920 साली भारतात कम्युनिस्ट पक्षाचा उदय झाला आणि 1940 पासून या पक्षाने ग्रामिण भागातील दोन मोठया लढयांचे नेतृत्व केले स्वातंत्र्यपुर्व काळातील बंगालमध्यीते भागण आंदोलन आणि दक्षिण भारतातील तिलंगाणाण आंदोलन या दोन्ही आंदोलनातकम्युनिष्ट पक्षाचासक्रिय सहभाग होता.बंगालमध्ये भातशेतीवर राबणा-या मजुरांचे मोठया प्रमाणात शोषणहोतहोते. जमीनदाराच्या शेतात राबणा-या या मजुरांनाखुपकमी मोबदला मिळायचा त्याच बरोबर जमीनदारांकडूनत्यांचे शारिरिक शोषणकेले जात होते.1946 ते 1951 या काळातकम्युनिस्ट पक्षाने मजुरांना सोबत घेवुन उत्पादित केलेल्या पिकाचेतीन भाग पाडण्यात यावेत.त्यातील एक भाग मालकाचा असेलतर उरलेल्या दोन भागावार मजुरांचाहक्क राहील असेसांगितले. त्यालाच ते भाग म्हणजेतीन भाग आंदोलन म्हणतात पुढे चालुन याच आंदोलनातुनकसेलत्याची जमीन ( नांगाल जोर जामीतार) ही मागणी पुढे आली यातुन शेकडो वर्ष चालत आलेल्या अन्याय अशा जमीनदारी पध्दती विरुध्द पहिला लढा सुरु झाला.

हैद्राबाद संस्थानामध्येसुध्दा जमीनदारांनी गरिबांची अशाच प्रकारे पिळवणुक सुरु केलीहोती वेठबिगारी, बळजबरीने करवसुली, गावातील जमीनदारांची दादागिरी, सावकारी, भुमिहीन शेतमजुर, अल्पभुधारक शेतकरी या शोषणाने त्रस्त झालेहोते.स्वातंत्रोत्तर काळातसत्ताधारी पक्षाचे याकडे दुर्लक्ष झालेहोतेत्यामुळे या सा-यांनीकम्युनिस्टांच्या नेतृत्वात या अत्याचाराविरुध्द लढा उभारला.सन 1946 ते 47 या काळात झालेले आंदोलने प्रामुख्याने व नलगोंडा, वारंगल आणि खम्मम या जिल्हयात अतिशय तिव्र दिसतात.या दोन्ही आंदोलनाच्या शेवटातुन हिंसक असा नक्षलवाद समोर आला.बंगालमध्यीते भागणआंदोलन मुस्लिम लिगच्या हस्तक्षेपानेसंपुष्टात आले.आणि मजुरांनी

मागणीकेलेला बरगादार कायदा अमंलात आला या कायदयामुळे मजुरांचा आंदोलनातील सहभाग कमीकमीहोतगेला.प्रत्यक्षात मात्र भुसुधार कायदा अमलात येण्यासाठी पुढील कित्येकवर्ष लागली.तेलंगनामध्ये मात्र कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यामध्येच फुट पडली आणि आंदोलनाचा शेवट झाला.या आंदोलनाच्या दरम्यान 13 सप्टेंबर 1948 ला केंद्राने लष्कर पाठवुन हैद्राबाद संस्थान ताब्यात घेतले.तेव्हा सामान्य जनतेने मोठा जल्लोषकेला.मात्र या जल्लोषामुळेकम्युनिस्टांचे मजुरांचे आंदोलन झाकोळलेगेले. बदलती परिस्थिती लक्षात घेताकम्युनिस्ट नेत्यांनी राजकीयक्षेत्रात प्रवेश करुन निवडणुका लढवल्या पाहिजेत असे मत मांडण्यात सुरुवातकेली, ते भाग आणि तेलंगणा आंदोलन थांबल्यामुळे भुमिहीनांना जमीन वाटपाचा कार्यक्रम जवळजवळ बंद पडला. चळवळीतील तरुण नेत्यांनीसरकारला विरोध करुन भुसुधारकार्यक्रम पुढे नेण्यास सुरुवातकेली.या आंदोलनातुन ज्योती बसु, चारु मुजुमदार, सुशीतल राम चौधरी यांनी 1968 मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची (CPIM) स्थापना केली.

नविन पक्षाच्या स्थापनेनंतर चारु मुजुमदारांनी हिसंक विचार मांडण्यास सुरुवातकेली.निवडणुका, कायदे, न्यायालय या मार्गाने भुमिहीनांना कधीच जमीन मिळणार नाही अशी भुमिका स्पष्टकेली.यातुनच दार्जिलिंग जिल्हयातील सिलीगुडी उपविभागामध्येतीन पोलिस ठाण्यांच्या हददीततेथील नागरिकांना सोबत घेवुन सशस्त्र उठाव सुरु केला.नक्षलवादी, फांसीदेवी व खारीबारी या गावांतील शेतजमुर मोठयासंख्येने सहभागी झाले.यामध्ये मुजुमदारांच्या सोबत कनु संन्याल व या भागातील आदिवासी नेते जंगल संथाल यांनी या उठावाचे नेतृत्वकेले आणि नक्षलवादी चळवळीचा जन्म झला.1967 ते 69 या काळात चारु मुजुमदारांच्या विचाराने प्रेरितहोउन अनेक तरुण या चळवळीत सामीलहोतगेले व हिंसक आंदोलने व्हायला सुरुवातझाली. आंध्र प्रदेशातीलश्रीकाकुलम, पार्वतीपुरम, ओरिसामधीलकोरापु, बिहार, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट या भागातील नेत्यांनी एकत्र येतसीपीएम पासून वेगळी चुल मांडली व सीपीआय या पक्षाची स्थापना केली 1 मे 1969 ला या नविन पक्षाची स्थापना झाली आणि मोठया प्रमाणात 1972 पर्यत हिंसक आंदोलन आणि नक्षलवादीहल्ले घडून आले.सन 1972 ला चारु मुजुमदार यांचा जेलमध्ये असतांनाच मृत्युझाला आणि आंदोलन शांत व्हायला सुरुवात झाली.

आंध्रप्रदेशातील डाव्या विचारसरणीच्या पक्षात फुट पडली आणि कोंडापल्ली सितारमय्या यांच्या नेतृत्वात 1979 मध्ये पिपल्स वॉर गुपची स्थापना झाली आणि पुन्हा हिसंक आंदोलने सुरु झाली भारतातील वेगवेगळया भागात 1979 नंतर नक्षलवादी हल्ले सुरुझाले. वेगवेगळी नाव धारणकय्न पक्षानेहिंसक आणि सशस्त्र लढा सुरु ठेवला. छत्तीसगडमधील तरुणांनी माओवादी कम्युनिस्टसेंटरची स्थापना केली आणि पिपल्स वॉर ग्रुपच्या मदतीने मध्यभारतातील दंडकारण्यात चळवळीची पुन्हा बांधणी सुरु केली. यानंतर मध्यभारताचे स्वरुप पुर्ण बदलुन गेले आणि प्रशासनाचे अस्तित्व नष्ट झाले शासकीय व्यवस्था आणि अधिकारी यांच्यावर हिसंकहल्ले करुन आदिवासी, भुमिहिन यांच्या रक्षणास सुरुवातकेली शासकीय अधिकारी आदिवासींचा छळकरतात असेसांगुन आदिवासींना शासन आणि सरकार विरोधी लढयात आपल्या बाजुला ओढुन घेतले यासाठी मोठया प्रमाणात बंदुकीचा धाक दाखविण्यात आला.1990 च्या दशकात अबुजमाड पहाडावर गनिमी युध्दाचे प्रशिक्षणकेंद्र सुरुकेले मा. यामुळे आदिवासींच्या मनात भिती निर्माण व्हायला सुरवात झली 1993 मध्ये पिपल्स वॉर ग्रुपमध्ये फुट पडली आणि जनशक्ती दलम या वेगळया गटाची स्थापना झाली

**नक्षलवादी चळवळीच्या अंताची सुरुवात** -

सन 2011 साली मारलागेलेला नक्षलवादी चळवळीचा प्रवक्ता आझाद यानेही चळवळ जिवंत ठेवण्याचा एक शेवटचा प्रयत्न केला त्याच्या पुढाकाराने 2003 मध्ये अबुजमाड पहाडावर देशभरातील नक्षलवादयांची एक महासभा घेण्यात आली. अनेक वेगवेगळया गटात विभगली गेलेली चळवळ पुन्हा एकाच झेंडयाखाली आणण्याचा प्रयत्न यात करण्यात आला. सन 2004 मध्ये भारतीय कम्युनिस्ट पार्टी माओवादी या झेंडयाखाली देशभरातील नक्षवादी एकत्र आले व माओवादी म्हणून ओळखले जाऊलागले.सशस्त्र संघर्ष सुरु झाला कीकोणत्याही भुमिगत संघटनेसमोर प्रश्न उभा राहतो.तो आपल्या बाजुने कोण आहे.त्याचा आपल्या बाजुने उभी राहणारी जनता कीसंघटना महत्वाची आणि चळवळीचा अस्तित्वासाठी त्यांनीसंघटनेला महत्व दिले आणि जनतेला वा-यावरसोडले. आत्तापर्यंत जनतेच्या हक्कासाठी लढणा-या नक्षलवादी चळवळीने स्वत:च्या अस्तित्वासाठी या भागातीलश्रीमंत जमिनदार, व्यापारी, सरकार यांच्याकडून पैसा उकळण्यास सुरवात केली. या परिस्थितीत जनतने साथ सोडू नये म्हणून नक्षलवादयांनी मग केवळ दहशतीचा वापर करुन नागरिकांचा पाठींबा मिळवला.पोलीस, सैन्य आणि नक्षलवादीहयांच्या कचाटयातसापडलेला आदिवासी हतबल झाला.नक्षलवादी चळवळीने बंदुकीचा धाक दाखवुन मोठया प्रमाणात आदिवासी तरुणांना यात समाविष्ट करुन घेतले.मोठया प्रमाणात आदिवासी स्त्रियावर अन्याय होतगेल्याचे यात दिसून येते. जनतेच्या मनात असणारी आपुलकी भितीमध्ये बदलत जाऊन नक्षलवादी चळवळीबददल राग सुरुझाल्याचे दिसते.सन 2009 ते 2012 या काळात 561 नक्षलवादी मारलेगेलेतर 8398 नक्षलवादी कैदकरण्यात आले आजपर्यंत देशभरात 2601 नक्षलवादी मारलेगेले.नक्षलवादी चळवळीमध्ये बंदुकीच्या धाकामुळे सहभागीझाल्यामुळे अनेक तरुण तरुणींचे जीवन बदलुन गेलेहोते.मात्रसरकारने

| Special Issue 25 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

आत्मसमर्पन करण्याच्या योजनेची घोषणा करुन त्यांना नविन दिशा दाखवली.यामुळेहजारो युवक युवती यांनी नक्षलवादी चळवळीतुन बाहेर पडून आत्मसमर्पनकेले.मागील वर्षी 635 नक्षलवादयांनी आत्मसमर्पन केले.नक्षलवादी चळवळीचे स्वरुपखंडणीखोरसंघटनेत झाल्याचे दिसून येते चळवळीने आता राजकीय उदिदष्टांच्या गप्पा सुरु करुन शहरी तरुण वर्गाला आपल्या जाळयात ओढण्याचा प्रयत्न चालुकेला आहे.तो निश्चितच देशाच्या अखंडतेला धोका असल्याचे दिसते.

**संदर्भ सुची**

1. गावंडे देवेंद्र, नक्षलवादाचे आव्हान, साधना प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर 2012.
2. कुरंभटटी विभाकर, शहरी नक्षलवाद की भारतीय संविधान, तरुण भारत परिवार प्रकाशन, जळगाव 2018.
3. गुप्ता एम.एल. शर्मा.डी.डी., समाजाशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा.
4. सक्सेना विवेक, नक्सली आतंकवाद, प्रभात प्रकाशन, पुणे, जानेवारी, 2013.
5. रॉय अरुधंती, भुमकाल, राजकमल प्रकाशन, दिल्ली, 2012.